# महाराष्ट्र विधानसभा
## चौथे अधिवेशन, २०१४

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**शुक्रवार, दिनांक १९ डिसेंबर, २०१४ / आग्रहनय २८, १९३६ ( शके )**

**(१) शालेय शिक्षण आणि क्रीडा मंत्री**
**(२) उच्च व तंत्रशिक्षण मंत्री**
**(३) वैद्यकीय शिक्षण मंत्री**
**(४) मराठी भाषा मंत्री**
**(५) सांस्कृतिक कार्य मंत्री**

**} यांचे प्रभारी विभाग**

**प्रश्नांची एकूण संख्या - २३**

### मुलुंड (पश्चिम) (मुंबई) येथे क्रीडा संकुलाची उभारणी करण्याबाबत

**(१) * ३९९५ श्री.सरदार तारासिंह (मुलुंड) :** सन्माननीय **क्रिडा मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(१) मुलुंड (पश्चिम) येथे क्रीडा संकुल उभारण्यासाठी प्रायोगिक तत्वावर करार करण्यात आलेला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर क्रीडा संकुलाकरिता स्थानिक लोकप्रतिनिधीनी आपल्या निधीतून २० लाख रुपये दिलेले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अद्यापपर्यंत सदर क्रीडा संकुल उभारणीसाठी शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येणार आहे तसेच सदर क्रीडा संकुल उभारण्याकरीता किती कालावधी अपेक्षित आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) व (२) हे खरे नाही.
(३) सदरहू ठिकाणी तालुका क्रीडा संकुल उभारणी करणे करिता सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत अदांजपत्रक व आराखडे तयार करण्यात येत आहेत. अदांजपत्रक व आराखडा प्राप्त झाल्यानंतर राज्य क्रीडा विकास समितीची मान्यता प्राप्त करुन घेऊन निधी उपलब्ध करण्याची कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

### शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर येथे लोकनेते बाळासाहेब देसाई अध्यासन केंद्रास निधी मिळणेबाबत

**(२) * २९८० श्री.शंभुराज देसाई (पाटण) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर येथील शिवाजी विद्यापीठाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षात विद्यापीठाचे शिल्पकार लोकनेते बाळासाहेब देसाई यांच्या नावे अध्यासन केंद्र सुरू करणेकरिता राज्य शासनाने मान्यता दिली असुन सदरील कामाकरिता निधी उपलब्ध करून देणेबाबत उच्च व तंत्र शिक्षण विभागाने दिनांक १७ जानेवारी, २०१३ रोजी शासन निर्णय जारी केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सन २०१३ पासून सदरचे अध्यासन केंद्र सुरू करणेसंबंधी निधीची तातडीने आवश्यकता असुन याकरिता शिवाजी विद्यापीठ यांचेकडून शासनाला वारंवार पत्रव्यवहार केला जात असतानाही सदरील कामास निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने उक्त अध्यासन केंद्रास त्वरीत निधी उपलब्ध करून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय.
(२), (३) व (४) शिवाजी विद्यापीठाच्या सुवर्ण महोत्सवानिमित्त विद्यापीठास विविध उपक्रमासाठी शासन स्तरावरुन मान्यता देण्यात आली. त्यामध्ये बाळासाहेब देसाई या अध्यासन केंद्रा बरोबरच नवीन पदनिर्मिती, बांधकाम, साधनसामुग्री इ. चा समावेश आहे. त्यासाठी शासनाने रु. ४०.३३ कोटी एवढ्या रकमेस मान्यता दिलेली आहे.
शासनाकडे असलेला उपलब्ध निधी विचारात घेऊन विद्यापीठास निधी वितरीत केला जातो. या अध्यासन केंद्रासाठी निधी उपलब्ध करुन देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

-----------------

## राज्यातील महाविद्यालयात रॅगीग विरोधी समित्या स्थापन करण्याबाबत

**(३) * २४३८ श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(१) महाविद्यालयात होणारे रॅगिंगचे प्रकार टाळण्यासाठी खाजगी विद्यापीठे आणि महाविद्यालयांत शासनाने माहे जुलै २००७ मध्ये आदेश काढूनही शासकीय महाविद्यालयात रॅगिंग विरोधी समित्या स्थापन झाले नसल्याचे दिनांक १७ नोव्हेंबर, २०१४ रोजी मुंबई उच्च न्यायालयात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय. दि.१७ नोव्हेंबर, २०१४ रोजी राज्यातील २८ शासकीय महाविद्यालयांपैकी शासकीय विधी महाविद्यालय, मुंबई वगळता इतर महाविद्यालयात रॅगिंग विरोधी समित्या स्थापन झाल्या आहेत. शासकीय विधी महाविद्यालय, मुंबई येथे दि.३.१२.२०१४ च्या आदेशान्वये समिती स्थापन करण्यात आलेली आहे.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## ससून सर्वोपचार रुग्णालय (जि.पुणे) येथील विविध समस्यांबाबत

**(४) * ४२५६ श्री.जगदीश मुळीक (वडगाव शेरी) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे शहरातील ससून सर्वोपचार रुग्णालय येथील मलनिसा:रण पाईपलाईन नादुरुस्त असल्याने व रुग्णालयामध्ये मोकळया जागेमध्ये सांडपाणी साचले असून या ठिकाणाची नियमित स्वच्छता होत नसल्याने रुग्णालय परिसरामध्ये दुर्गंधी व डासोत्पती केंद्रे निर्माण झाली आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच सदरील रुग्णालयामध्ये असलेली रोगनिदान उपकरणापैकी बरीच यंत्रे बंद असल्याने याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, त्यानुषंगाने चौकशीत दोषी आढळलेल्या संबंधित दोषीवर शासनाने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.
(२) सर्व रोग निदान यंत्रे सुस्थितीत असल्याने चौकशीचा प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) लागू नाही.

-----------------

**राज्यातील राष्ट्रीय सर्वेक्षणाचे काम करणाऱ्या शिक्षकांना मागील तीन वर्षापासून मानधन देण्यात आले नसल्याबाबत**

**(५) * ४१५८ प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील राष्ट्रीय सर्वेक्षणाचे काम करणाऱ्या शिक्षकांना मागील तीन वर्षापासून मानधन देण्यात आले नसल्यामुळे त्यांच्यात तीव्र असंतोष पसरला असल्याचे माहे जून, २०१४ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू शिक्षकांना थकित मानधन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१), (२) व (३)
राज्यातील सामाजिक, आर्थिक व जात सर्वेक्षण २०११ करीता प्रगणक व पर्यवेक्षक म्हणून नियुक्त करण्यात आलेल्या बहुतांशी कर्मचा-यांना मानधनाची रक्कम अदा करण्यात आलेली आहे. परंतु निधीची उपलब्धता विचारात घेता काही ठिकाणी कर्मचा-यांना साधारणत: ५० % इतके मानधन अदा करण्यात आलेले आहे.
आता सामाजिक, आर्थिक व जात सर्वेक्षणाचे काम अंतिम टप्प्यात आलेले असून प्रारुप यादी प्रसिध्द करणे दावे ओक्षप निकालात काढणे इत्यादी प्रक्रिया सुरु करण्यात येत आहे. या सर्वेक्षणाचा कालावधी वाढल्यामुळे खर्चात वाढ झाली असून राज्य शासनाने केंद्र शासनाकडे अतिरिक्त निधीची मागणी केलेली आहे. केंद्र शासनाकडून निधी प्राप्त होताच प्रगणक/पर्यवेक्षकांच्या मानधनाकरीता निधी वितरीत करण्यात येईल.

-----------------

**सेंट झेवियर व रेयॉन ग्रुप ऑफ स्कुल, मुंबई मध्ये सेवाशर्तीचे होत असलेले उल्लंघन**

**(६) * ३१७७ श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-

(1) मुंबई विभागातील सेंट झेवियर व रेयॉन ग्रुप ऑफ स्कूल मध्ये कर्मचा-यांच्या रजेचे नियम ,शालेय कामाचे दिवस व शिक्षणविषयक शासकीय नियम पाळले जात नाहीत तसेच प्रशिक्षित पदवीधरांना अपदवीधरांची वेतन श्रेणी देणे, किरकोळ रजा शिल्लक असताना रजा विनावेतन करणे,शिक्षकांविरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही करणे, शिक्षकांना सतत तणावाखाली ठेवणे इत्यादी बाबी संदर्भात शिक्षक संघटनांनी शिक्षण उपसंचालक, मुंबई यांच्याकडे वारंवार तक्रारी केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना शासकीय वेतनश्रेणीनुसार वेतन दिले जात नाही व शिक्षकांना त्यांच्या शैक्षणिक अर्हतेप्रमाणे वेतन व वर्गअध्यापन दिले जात नाही, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, म.खा.श.क. सेवाशर्ती अधिनियम व नियमावलीचे आणि शासनाच्या विविध व्यवस्थापन विषयक आदेशाप्रमाणे कार्यवाही न करणा-या सदर संस्थेविरुध्द कोणती कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय

(२), (३) व (४) प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी करण्यात येत असून चौकशी अहवालातील निष्कर्षानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

-----------------

## वांद्रे (पूर्व) शासकीय वसाहतीमधील (वांद्रे (पुर्व), (मुंबई) येथील खेळाचे मैदान तालुका क्रीडा संकुल समिती, अधेंरी यांच्या ताब्यात दिले असल्याबाबत

**(७) * ३५०८ श्री.प्रकाश (बाळा) सावंत (वांद्रे पूर्व), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.पराग अळवणी (विलेपार्ले) :** सन्माननीय **क्रिडा मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-

(१) वांद्रे (पूर्व) (मुंबई) येथील शासकीय वसाहतीमधील इमारत क्र. १ ते ४ च्या समोरील कर्मचाऱ्यांच्या मुलांना खेळण्यासाठी आणि जेष्ठ नागरिकांना फेरफटका मारण्यासाठी असलेले मैदान शासनाने क्रीडा संकुल समिती, अधेंरी यांच्या ताब्यात दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर क्रिडा समिती या मैदानावर भव्य क्रिडा संकुल उभारणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर मैदानाची देखभाल करण्यात येत नसल्याने सद्य:स्थितीत मैदानाचा वापर मोठ-मोठे ट्रक, टँकर उभे करण्यासाठी व दुरुस्तीसाठी गॅरेज तसेच अनधिकृत बांधकामे उभी राहणे तसेच मैदानात दिवाबत्तीची सोय नसल्याने रात्रीच्या वेळी गर्दुल्यांचा अड्डा, सदर मैदानावर कचऱ्याचे ढीग, सांडपाण्यामुळे दलदल, समाजकंटकांचा स्वैराचार तसेच मैदानाची संरक्षक भिंती कोसळली असल्याने त्यापरिसरातील जनजीवन असुरक्षित झाले असल्याचे दिनांक २५/११/२०१४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे

(४) असल्यास, तेथील नागरिकांनी अधेंरी तालुका क्रिडा अधिकारी, खेरवाडी पोलीस ठाणे, आयुक्त, मुंबई महानगरपालिका, जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर, तालुका क्रिडा संकुल समितीचे तहसिलदार तथा अध्यक्ष इत्यादीकडे लेखी तक्रारी करुन या मैदानातील सर्व बेकायदेशीर अनधिकृत व्यवसाय, बांधकामे व गर्दुल्यांच्या त्रासातून मुक्तता व्हावी यासाठी कारवाई करावी अशी मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर तक्रारी व मागणीच्या अनुषंगाने आतापर्यंत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे वा सुरु असलेल्या कारवाईची सद्य:स्थिती काय आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय
(२) सदर ठिकाणी तालुका क्रीडा संकुल उभारण्याचे प्रस्तावीत आहे.
(३) व (४) हे खरे आहे. सदर ठिकाणी अनधिकृतपणे गाड्या पार्किंग केल्या जात असल्याचे, तसेच अतिक्रमण वाढत असल्याचे व रात्रीच्या वेळी समाजकंटकांच्या स्थानिक रहिवाशांना त्रास होत असल्याचे निदर्शनास आल्यामुळे तालुका क्रीडा संकुल समिती, अधेरी यांचे वतीने खेरवाडी पोलिस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांच्याकडे तक्रार नोंदविण्यात आलेली आहे. तसेच सहाय्यक आयुक्त, एच/पूर्व विभाग बृहन्मुंबई महानगरपालिका, सांताक्रुज यांच्याकडे सदर जागेवरील अनधिकृत अतिक्रमण काढण्याबाबत पत्र व्यवहार करण्यात आलेला आहे.
(५) त्याअनुषंगाने पोलिसांनी सदर ठिकाणी गस्त सुरु केली असून महानगरपालिके मार्फत अतिक्रमण हटविण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.
(६) प्रश्नच उद्भवत नाही.

-----------------

**ठाणे व पालघर या जिल्ह्यातील जिल्हापरिषद शाळांमधील शिक्षकांना वेतन मिळाले नसल्याबाबत**

**(८) * २५५ श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(1) पालघर व ठाणे जिल्ह्यात पालघर, डहाणू, वसई, तलासरी, वाडा, जव्हार, मोखाडा व विक्रमगड या आदिवासी भागातील जिल्हापरिषदेच्या शाळांमधील शिक्षकांना मागील काही महिन्यापासून वेतन मिळाले नसल्याने त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली असल्याचे माहे ऑक्टोबर, 2014 रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, सदरहू ठिकाणच्या शाळांमधील शिक्षकांना त्यांचे वेतन तातडीने मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(3) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही
(२) (३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**शासनाच्या सिडेनहॅम मॅनेजमेंट महाविद्यालयात (मुंबई) माहे जून, २०१५ पासून एम.एम.एस.ची अतिरिक्त तुकडी सुरु करण्याबाबत**

**(९) * ३१५३ श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई विद्यापिठातंर्गत जमनालाल बजाज इन्स्टिटयुट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज, मुंबई हे महाविद्यालय सन २०१४-१५ पासून स्वायत्त (ॲटॉनॉमस) हेत असल्याने सदर महाविद्यालयातील एम.एम.एस. शिक्षणातील मुंबई होम युनिव्हर्सिटीच्या विद्यार्थ्यांचा

८५ टक्के जातीनिहाय प्रवेश कोटा संपुष्टात आल्याची बाब माहे नोव्हेंबर, २०१४ च्या दुसऱ्या सप्ताहात वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निर्णयामुळे मुंबई होम युनिव्हर्सिटीच्या माहे फेब्रुवारी /मार्च, २०१५ च्या मॅनेजमेंट प्रवेश परीक्षची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या होम युनिव्हर्सिटीच्या उपलब्ध जागा कमी झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाच्या सिडेनहॅम मॅनेजमेंट महाविद्यालय, मुंबई माहे जून, २०१५ पासून एम.एम.एस. ची १८० प्रवेश क्षमतेची वाढीव/अतिरिक्त तुकडी सुरू करून मुंबईच्या विद्यार्थ्यांना ८५ टक्के जातीनिहाय होम युनिर्व्हसिटी प्रवेश कोटा मिळवून देण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय,
(२) होय,
(३) असा प्रस्ताव प्राप्त झालेला नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यातील ग्रंथालयाच्या अ,ब,क, ड वर्गातील**
**ग्रंथालयाचे प्रस्ताव मान्यतेसाठी प्रलंबित असल्याबाबत**

**(१०) * ४४२८ श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील ग्रंथालयाच्या अ,ब,क,ड वर्गातील ग्रंथालयाचे प्रस्ताव मान्यतेसाठी प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रस्तावांना मान्यता देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) नाही.
(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मुंबई विद्यापिठाशी संलग्न असलेले ग्रामीण**
**भागातील महाविद्यालये उपग्रहाद्वारे जोडण्याबाबत**

**(११) * ३७०१ श्री.संदीप नाईक (ऐरोली) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई विद्यापिठाशी संलग्न असलेली ग्रामीण भागातील महाविद्यालये उपग्रहाद्वारे जोडण्याच्या महत्त्वाकांक्षी प्रकल्पास विद्यापिठाने मान्यता दिली असून उक्त प्रकल्पामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना अद्ययावत तंत्रज्ञानाच्या माध्यमातून दुहेरी संवादाची किमया साधण्यासह विद्यार्थ्यांना सुस्पष्ट चलचित्र आणि ध्वनि प्रेक्षपण उपलब्ध करुन देण्यात येणार आहे त्यामुळे विद्यार्थ्यांना थेट प्रश्न विचारुन त्यांच्या शंकेचे निरसन करता येणार आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, किती ग्रामीण महाविद्यालये उपग्रहाद्वारे आतापर्यंत मुंबई विद्यापिठाला जोडण्यात आली आहे वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय.
(२) दिनांक ५ नोव्हेंबर, २०१४ रोजीच्या मुंबई विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत या प्रकल्पाला तत्वत: मान्यता देण्यात आली आहे व त्यानुषंगाने पुढील कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**नवरगाव (ता.सिंदेवाही,जि.चंद्रपूर) येथे प्राथमिक शाळांतील स्वयंपाकगृह शेडचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत**

**(१२) * ३०३४ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-

(१)राज्यातील सर्व प्राथमिक शाळांमध्ये शालेय विद्यार्थ्यांना पोषण आहार शिजविण्यासाठी शालेय पोषण आहार योजने अतंर्गत स्वयंपाकगृह शेड बांधकाम करण्याचे कंत्राट एकाच कंत्राटदार कंपनीला देण्यात आले, हे खरे आहे काय,
(२)असल्यास, नवरगाव(ता.सिंदेवाही,जि.चंद्रपूर) येथे सदर कंत्राटदाराने निकृष्ट दर्जाचे बांधकाम करीत असतांना ग्रामस्थांनी पकडले व याची तक्रार वरिष्ठ अधिका-याकडे केली असता अद्यापही कार्यवाही झालेली नसल्याची माहिती दिनांक 24 नोव्हेंबर, 2014 रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, चंद्रपूर जिल्ह्यातील सर्व प्राथमिक शाळेतील निकृष्ट दर्जाचे बांधकाम करण्यात येत असलेल्या स्वयंपाकगृह शेडची पाहणी करण्यात आली आहे काय, त्यानुषंगाने चौकशी करून सदर कंत्राटदारावर कोणती कारवाई केली आहे, वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, याबाबत होणा-या विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे आहे.
(२) सदर खाजगी अनुदानित शाळेमध्ये प्री-फॅब्रीकेटेड स्वरुपाचे स्वयंपाकगृह बांधकाम सुरु करण्यात आलेले होते. सदर बांधकामाच्या दर्जाबाबत तक्रार प्राप्त झाली होती. तथापि, सदर बांधकामास मान्यता नसल्याने बांधकाम थांबविण्यात आले आहे.
केंद्र शासनाने सदर शाळेसाठी प्लीन्थ एरीया नॉर्म्सनुसार स्वयंपाकगृह बांधकाम मंजूर केलेले आहे.
(३) प्री-फॅब्रीकेटेड स्वयंपाकगृह बांधकामाच्या तपासणीसाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराची नियुक्ती करण्यात आलेली असून त्यांच्या मार्फत वेळोवेळी बांधकामाची तपासणी करण्यात येते.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**कल्याण (जि.ठाणे) येथे बेरोजगार विद्यार्थ्यांकरिता औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे बांधकाम सुरु करण्याबाबत**

**(१३) * ४०८९ श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण (जि.ठाणे ) तालुक्यातील बेरोजगार विद्यार्थ्यांकरिता शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था मंजूर करण्यात आली असून, सदर शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे बांधकाम अद्यापपावेतो सुरु करण्यात आले नाही तसेच सदर आरक्षित जागेवर मोठ्या प्रमाणावर अतिक्रमण झाले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुसार उक्त औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे बांधकाम त्वरीत सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे. तसेच सदरील बांधकाम केंव्हापर्यंत सुरु होणे अपेक्षित आहे. तसेच उक्त प्रशिक्षण केंद्राच्या आरक्षित जागेवरील अनधिकृत बांधकाम हटविण्याबाबत शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे बांधकाम उंबर्डे , ता.कल्याण येथे नोव्हेंबर, २०१३ पासून सुरु झाले असून, मार्च, २०१५ पर्यंत बांधकाम पूर्ण होणे अपेक्षित आहे.संस्थेस हस्तांतरीत जागेवर चार घरांचे अतिक्रमण झालेले आहे.
(२) अनधिकृत बांधकाम हटविण्याबाबत दि.१०/५/२०१४ रोजी कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या सहकार्याने कार्यवाही करण्यात आली होती. मात्र, विरोध झाल्याने व पुरेशा पोलीस बंदोबस्ताअभावी कार्यवाही पूर्ण झाली नाही. लवकरच कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या सहकार्याने पुरेसा पोलीस बंदोबस्त घेवून कार्यवाही करण्यात येणार आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यातील होमिओपॅथी डॉक्टरांना ॲलोपॅथी औषधे वापरण्यास परवानगी देण्याबाबत**

**(१४) * ५४८ श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील साठ हजार होमिओपॅथी डॉक्टरांना ग्रामिण विभागातील आयुर्वेदिक डॉक्टरांप्रमाणे ॲलोपॅथी औषधे वापरण्यास परवानगी मिळत नसल्याने राज्यात परीपुर्ण वैद्यकीय सेवा पुरेशा प्रमाणात उपलब्ध होत नसल्याने रुग्णांवर योग्य ते उपचार होत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्याची लोकसंख्या वाढत असुनही आवश्यक त्या प्रमाणात वैद्यकीय सेवा राज्यात उपलब्ध होत नसल्याचे लक्षात घेता राज्यातील होमिओपॅथी डॉक्टरांना ॲलोपॅथी औषधे वापरण्यास परवानगी देण्याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला व त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :**

(१) हे खरे नाही.
(२) होमिओपॅथी व्यवसायिकांनी ॲलोपॅथी चिकित्सा पध्दतीचा एक वर्षाचा औषधशास्त्र (फार्माकॉलोजी) विषयाचा अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर त्यांना ॲलोपॅथीचा व्यवसाय करण्यास परवानगी देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

----------------

## विरार (जि.ठाणे) येथील शिरसाड फाटा परिसरात असलेल्या जिल्हा परिषदेच्या शाळेची भिंत कोसळून मुलाचा झालेला मृत्यू

**(१५) * ९३ श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-

(१) विरार (जि.ठाणे) येथील शिरसाड फाटा परिसरात असलेल्या जिल्हा परिषदेच्या शाळेची भिंत कोसळून झालेल्या अपघातात इयत्ता चौथीत शिकत असलेल्या विद्यार्थ्याचा मृत्यू झाल्याची घटना दिनांक १३ ऑक्टोबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास घडली, हे खरे आहे काय,

(२) तसेच राज्यातील जिल्हा परिषदेच्या शाळा व विशेषत: बिबवेवाडी (जि.पुणे ) येथील यशवंतराव चव्हाण विद्यालय व महापालिकेच्या अन्य शाळांच्या इमारती अतिशय धोकादायक होऊनही त्यांची दुरुस्ती करण्यात येत नसल्याने दुरवस्था झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत पाहणी केली आहे काय, असल्यास, पाहणीचे निष्कर्ष काय आहेत, त्यानुसार मोडकळीस आलेल्या व अतिशय धोकादायक असलेल्या शाळांच्या इमारतीची तातडीने दुरुस्ती होण्याबाबत तसेच प्रश्न भाग(१) मधील मृत्यू पावलेल्या विद्यार्थ्याच्या कुटूंबाला आर्थिक मदत देण्याबाबत शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) अशंत: खरे आहे.

सर्व शिक्षा अभियान अंतर्गत बांधण्यात आलेल्या समूह साधन केंद्राच्या बाहेरील भिंतीच्या भोवती विद्यार्थी लपाछपीचा खेळ खेळत असताना फलकाची भिंत अंगावर पडल्याने विद्यार्थ्यांचा अपघाती मृत्यू झाला.

(२) नाही.

(३) इमारत मोडकळीस आलेली नव्हती. मुलांच्या अपघाती मृत्यूच्या संदर्भात गट विकास अधिकारी व गट शिक्षण अधिकारी पंचायत समिती वसई यांनी समक्ष पाहणी केली असून मृत्यू पावलेल्या मुलाच्या कुटुंबाला आर्थिक मदत देण्याबाबत पंचायत समिती वसई यांनी राजीव गांधी सुरक्षा योजना अंतर्गत जिल्हा परिषद, ठाणे यांच्याकडे प्रस्ताव सादर केला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वसंतराव नाईक वैद्यकीय महाविद्यालय (जि.यवतमाळ) येथील प्रशासकीय गैरकारभाराबाबत

**(१६) * ३९८१ श्री.मदन येरावार (यवतमाळ) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-

(१) वसंतराव नाईक वैद्यकीय महाविद्यालय (जि.यवतमाळ) येथील अधिष्ठाता यांचे कर्मचाऱ्यांवर नियंत्रण नसल्यामुळे तज्ज्ञ डॉक्टरांची व कर्मचा-याची अनुपस्थिती, क्ष-किरण तपासणी, सोनोग्राफी व सिटीस्कॅन या सारख्या सेवा बंद असून तेथील रुग्णांना व सोबतच्या नातेवाईकांना योग्य त्या वैद्यकीय सेवा मिळत नसल्याने त्यांना खाजगी

रुग्णालयात जावे लागते तसेच विशेषत: मोठया संख्येने रुग्णांना प्रसुतीसाठी आलेल्या कार्यरत कर्मचारी व डॉक्टरांकडून योग्य ती माहिती देण्यात येत नसून फक्त १० ते १५ रुग्णांची तपासणी करुन संबंधित डॉक्टर निघून जातात व उर्वरीत रुग्णांना पुढची तारीख दिली जात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास, त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अजंनवेल (ता.गुहागर, जि.रत्नागिरी) येथील ऐतिहासिक गडाकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष

**(१७) * ४३६० श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(१) गुहागर (जि.रत्नागिरी) तालुक्यातील अजंनवेल गावात असलेल्या गोपाळगड या ऐतिहासिक गडाच्या डागडुजीकडे प्रशासनाचे दुर्लक्ष होत असून सदरील किल्ला ऱ्हास पावत चालला असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१४ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुसार सदरील किल्ल्याची त्वरीत दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** ( १) नाही,
गोपाळगड किल्ला दिनांक ४.११.२००९ च्या शासन निर्णयान्वये राज्य संरक्षित स्मारक म्हणून घोषित करण्याची प्राथमिक अधिसूचना निर्गमित करण्यात आली आहे. सदर स्मारकाची सध्या पडझड झालेली नाही. तसेच राज्य संरक्षित स्मारकांची आवश्यकतेनुसार व निधीच्या उपलब्धतेनुसार नियमितपणे जतन व दुरुस्तीची कामे पुरातत्व विभागामार्फत केली जातात.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नागपूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात रक्त संकलन करणारी ब्लड मोबाईल व्हॅन सुरु करण्यासह तेथील ई-लायब्ररीच्या इमारतीतील फर्निचर व संगणक याकरीता निधीची तरतूद करण्याबाबत

**(१८) * १८९८ श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात रक्त संकलन करणारी सुमारे १.३० करोड रुपये किंमत असलेली ब्लड मोबाईल व्हॅन सुमारे एक वर्षा पासून नॅको या संस्थेकडून मिळणारे अनुदान बंद झाल्याने व डिझेल अभावी बंद असल्याने रक्त पेढीत रक्ताचा तुटवडा निर्माण झाल्यामुळे रुग्णांची गैरसोय होत असल्याचे तसेच उक्त महाविद्लयाच्या परिसरात बांधण्यात आलेल्या ई-लायब्ररीच्या इमारतीत निधी अभावी अद्यापी फर्निचर व्यवस्था व संगणक नसल्याने सदरील लायब्ररीचा नागरीकांना काहीच उपयोग होत नसल्याचे दिनांक १६ व १७ नोव्हेंबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणांची चौकशी करण्यात आली आहे काय , असल्यास चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुसार उक्त महाविद्यालयातील रक्त संकलन करणारी ब्लड मोबाईल व्हॅन त्वरीत सुरु करण्यासह उक्त महाविद्यालयाच्या परिसरात बांधण्यात आलेल्या ई-लायब्ररीच्या इमारतीस फार्निचर व संगणक याकरीता त्वरीत निधी उपलब्ध करण्याबाबत शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, असल्यास, साधारणत: केंव्हापर्यंत उक्त व्हॅन सुरु होणे अपेक्षित आहे ,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) रुग्णांची गैरसोय होते हे खरे नाही कारण रक्ताचा पुरवठा सुरळीत सुरु आहे.
केंद्र शासनामार्फत नॅकोतर्फे प्राप्त होणाऱ्या अनुदानाअभावी व्हॅनचा वापर तात्पुरत्या स्वरुपात बंद आहे.
ई-लायब्ररीच्या इमारत कार्यान्वित झाली आहे.
ई-लायब्ररी ही सुविधा नागरिकांसाठी नाही.
ई-लायब्ररीसाठी फर्निचर व संगणक खरेदी प्रक्रिया सुरु आहे.
(२) चौकशी करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
केंद्र शासनाच्या नॅकोतर्फे अनुदान प्राप्त होताच सदर व्हॅन वापरात येईल.
निधी उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**शिक्षणाधिकारी (प्राथमिक) परभणी यांनी केलेल्या नियमबाह्य कारभाराबाबत**

**(१९) * ४४५० श्री.विजय भांबळे (जिंतूर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(1) परभणी जिल्हा परिषदेतील शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी वार्षिक बदल्या पदोन्नती व इतर प्रकारात लाखो रुपयांचा गैरप्रकार केल्यावरुन त्यांची चौकशी करण्यात यावी अशी मागणी पत्रकार श्री.काद्री यांनी सचिव शालेय शिक्षण, मुंबई यांच्याकडे माहे मे-जून, 2014 मध्ये वा त्या दरम्यान लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, बदली प्रकरणातील अनियमितता व आर्थिक व्यवहार यांची चौकशी करण्यात आली आहे काय, त्यानुषंगाने संबंधित शिक्षणाधिकारी यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(3) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) शिक्षणाधिकारी (प्राथ.), जि.प. परभणी यांच्या सन २०१३ मधील सामान्य बदल्या व इतर नियमबाह्य कारभाराबाबत श्री.कादरी यांचे दि. २८ मार्च, २०१४ रोजीचे निवेदन या विभागास एप्रिल, २०१४ मध्ये प्राप्त झालेले आहे.
(२) या प्रकरणी चौकशी करण्याचे आदेश आयुक्त शिक्षण यांना देण्यात आले आहे. चौकशीअती अनियमितता आढळल्यास दोषी अधिकाऱ्या विरुध्द कारवाई करण्यात येईल.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**शासकीय, निमशासकीय व इतर `क्षत्रांमध्ये खेळाडूंना देण्यात येणाऱ्या आरक्षणात अपंग खेळाडूंचा समावेश करण्याची शिफारस**

**(२०) * ३६४८ श्री.बच्चू कडू (अचलपूर), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **क्रिडा मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(१) शासकीय, निमशासकीय व इतर `क्षत्रांमध्ये खेळाडूंना देण्यात येणाऱ्या आरक्षणात अपंग खेळाडूंचा समावेश करण्याची शिफारस क्रीडा `क्षत्रातील तज्ञांच्या शासननियुक्त समितीने केली आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच, राज्यातील राष्ट्रीयकृत बँका, विमा योजना महामंडळ, एस.टी.महामंडळ, राज्य शासन इत्यादी शासकीय अथवा निमशासकीय कार्यालयामधील विविध प्रवर्गामध्ये कर्मचाऱ्यांची भरती करतांना अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडूंना नोकरीसाठी आरक्षण ठेवण्याबाबत लोकप्रतिनिधीनी माहे नोव्हेंबर, २०१४ मध्ये वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री यांना एक निवेदन दिले आहे, हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रश्न भाग (१)मधील समितीने केलेल्या शिफारशीच्या अनुषंगाने तसेच प्रश्न भाग (२) बाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येणार आहे ,
(४)नसल्यास , विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय
(२) होय
(३) व (४) क्रीडा `क्षत्रातील तज्ञांच्या समितीने सादर केलेल्या अहवालामध्ये काही अतिरिक्त बाबीचा समावेश होणे अपेक्षित आहे. त्यानुसार तज्ञ समितीचा सुधारित अहवाल प्राप्त करुन घेऊन पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.
अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडूंना नोकरीसाठी आरक्षण ठेवण्याबाबत लोकप्रतिनिधीनी मा.मुख्यमंत्री महोदयांना सादर केलेल्या दि.२७.११.२०१४ च्या निवेदनाच्या अनुषंगाने आवश्यक ती कार्यवाही करण्यात येत आहे.

-----------------

**राज्यातील प्राध्यापकांच्या प्रलंबित मागण्यांबाबत**

**(२१) * २९४३ श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील प्राध्यापकांच्या न्याय्य मागण्यांवर निर्णय घेतला जात नसल्याने प्राध्यापकांच्या संघटनांनी दिनांक १५ डिसेंबर, २०१४ पासून काम बंद आदोंलन करण्याचा निर्णय घेतलेला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रश्नी प्राध्यापकांच्या संघटनांनी दिनांक १९ नोव्हेंबर, २०१४ तसेच यापूर्वी वारंवार मा.उच्च व तंत्रशिक्षण मंत्री यांचेकडे निवेदनाद्वारे मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने सदर प्राध्यापकांच्या मागण्यांसंदर्भात शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(4) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) शिक्षक संघटनेने एकूण ११ मागण्यांसाठी दिनांक १५ डिसेंबर, २०१४ रोजी पासून बेमुदत काम बंद आदोलन करणार असल्याचे अकृषि विद्यापीठाच्या कुलगुरुंना कळविल आहे.
(२) होय.
(३) व (४) शिक्षण संघटनेने केलेल्या बहुतांश मागण्या राज्याच्या आर्थिक दायित्वात वाढ करणाऱ्या आहेत. सदर मागण्या तपासून त्यावर पुढील उचित कार्यवाही करण्यात येईल.

-----------------

**गडचिरोली जिल्ह्यात शासकीय वैद्यकिय रूग्णालयात सुसज्ज अतिदक्षता विभाग तयार करण्याबाबत तसेच नागपूर येथील रुग्णालय परिसरात हॅलीपॅड तयार करण्याबाबतचा प्रस्ताव**

**(२२) * ३४४५ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(१) गडचिरोली जिल्ह्यातील नक्षलवादी हल्ल्यातील जखमी जवानांसाठी तातडीने तेथील शासकीय वैद्यकिय रूग्णालयात सुसज्ज अतिदक्षता विभाग तयार करण्याबाबत तसेच नागपूर येथे मुंबईसह चेन्नई, दिल्ली व बंगळूर सारखा धर्तीवर शासकीय रूग्णालयाच्या परिसरात हेलीपॅड तयार करण्याबाबतचा प्रस्ताव जिल्हाधिकारी नागपूर यांच्याकडे संस्थास्तरावरून सादर करण्यात आला हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गडचिरोली जिल्हयातील शासकीय वैद्यकिय रुग्णालयात सुसज्ज अतिदक्षता विभाग तयार करण्याबाबत तसेच नागपूर येथील शासकीय रूग्णालयाच्या परिसरात हेलिपॅड तयार करण्याबाबत शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) होय.
(२) गडचिरोली जिल्हयातील नक्षलवादी हल्ल्यातील जखमी जवानांसाठी तातडीने उपचार करण्यासाठी गडचिरोली येथील शासनाच्या सामान्य रुग्णालयात ६ खाटांचा सुसज्ज अतिदक्षता विभाग कार्यान्वित आहे.
नागपूर येथील शासकीय रुग्णालय परिसरात हॅलिपॅड बांधण्याकरिता ३०० मीटर मोकळी जागा, विद्युत सबस्टेशन, विद्युत तारा, अतिविशोषपचार रुग्णालयाची उंच इमारत व मोठ्या प्रमाणात उंच झाडे या तांत्रिक बाबीचा अडथळा असल्याकारणाने त्याठिकाणी हॅलिपॅड बांधणे शक्य होणार नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**शासकीय वैदयकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर येथील ट्रॉमा सेंटरमधील रिक्त पदे भरण्याबाबत**

**(२३) * ३८४५ श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-

(१) शासकीय वैद्यकीय महाविद्यालय रुग्णालय नागपूर येथे ११ कोटी ६० लक्ष रुपये खर्च करुन ट्रॉमा सेंटर बांधण्यात आले असून या सेंटर करिता आवश्यक असलेला कर्मचारी वर्गा करिता ३०१ पदांच्या मागणीचा प्रस्ताव मेडीकल प्रशासनाकडून शासनास प्राप्त झाला आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गत १० महिन्यांपासुन इमारत तयार असताना उक्त पदांना मंजुरी न देण्यामागील कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उपरोक्त रुग्णालयाच्या ट्रॉमा सेंटरमध्ये आवश्यक असलेल्या उक्त पदांच्या मंजुरीकरिता शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, उक्त कार्यवाही पूर्ण होण्यास किती कालावधी लागणे अपेक्षित आहे ?

**श्री. विनोद तावडे :** (१) सदर सेंटरचे बांधकाम प्रगतीपथावर आहे व साधारणपणे मार्च १५ पर्यंत पुर्ण होणे अपेक्षीत आहे.

पदमंजूरीचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला असून तो मंजूरीच्या प्रक्रियेमध्ये आहे.

(२) ट्रॉमा सेंटर या इमारतीचे बांधकाम प्रगतीपथावर आहे.

(३) इमारत कार्यान्वित होईपर्यंत पदनिर्मिती करण्यात येईल.

-----------------

**विधान भवन :**
**नागपूर.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा**

मुद्रणपूर्व सर्व प्रकिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.